### ४.११ व्याकरणिक विशेष : {रीती भूतकाळ}

**नोंदीत दिलेल्या पर्यायांचा क्रम हा त्यांच्या एकूण सर्वेक्षणातील वारंवारितेनुसार दिलेला आहे याची नोंद घ्यावी.**

क्रियाव्याप्तीद्वारे क्रियेची पूर्णता, अपूर्णता, प्रगती किंवा पुनरावृत्ती दर्शविली जाते. एखादी क्रिया भूतकाळात नेहमी घडली असेल किंवा भूतकाळातील क्रियेची पुनरावृत्ती संदर्भित होत असेल तर त्यासाठी रीती भूतकाळातील क्रियारूप वापरले जाते. उदाहरण : प्रमाण मराठीतील 'मी पूर्वी कामावर ज़ायच्चो' या वाक्यातील 'ज़ायच्चो' या क्रियापदावरून भूतकाळातील कृतीची पुनरावृत्ती झाल्याची सूचना मिळते.

#### ४.११.१ व्याकरणिक विशेषाची नोंद

मराठीच्या बोलींमध्ये रीती भूतकाळ दर्शवण्यासाठी पाच प्रकारच्या पर्यायी रचना आढळल्या आहेत : (१) [क्रियापद-त+(होत-सुसंवाद)]; (२) [क्रियापद-आयच्च्-सुसंवाद]; (३) [क्रियापद-स्वर.सुसंवाद ओ/उ/इ/ए/अ]; (४) [क्रियापद-त+ज़ा-सुसंवाद]; (५) [क्रियापद-त+अस्-सुसंवाद]. सापडलेल्या पाचही प्रकारच्या संरचनांचा भौगोलिक प्रसार व उदाहरणे पुढे दिली आहेत.

##### ४.११.१.१ पर्यायी रचना १ : [क्रियापद-त+होत-सुसंवाद]

रीती भूतकाळ दर्शवण्यासाठी [क्रियापद-त+होत-सुसंवाद] ही पर्यायी रचना राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये आढळली.

**४.११.१.१.१ उदाहरण** (जि. रत्नागिरी, ता. दापोली, गाव पालगड, स्त्री३५, कुणबी, ४थी)

आमचे आइवडील भरपूर आमाला शिकव**त होते**

amčě aiwəḍil bʰərpur amala sĭkwə**t** **hote**

am-čĕ-e aiwəḍil bʰərpur ama-la sĭkwə-**t** **hot-e**

we.EXCL-GEN-3PL parents much we.EXCL-ACC teach-**IPFV** **be.PST-3PL**

Our parents used to teach us a lot.

##### ४.११.१.२ पर्यायी रचना २ : [क्रियापद-आयच्च्-सुसंवाद]

रीती भूतकाळ दर्शवण्यासाठी [क्रियापद-आयच्च्-सुसंवाद] ही रचना राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये दिसून आली आहे.

**४.११.१.२.१ उदाहरण** (जि. सिंधुदुर्ग, ता. दोडामार्ग, गाव आयी, स्त्री३३, कुंभार, ९वी)

शाळेत मज्जा करायच्चो आमी

sə̆ḷet məǰǰa kə**rayco** ami

sə̆ḷe-t məǰǰa kər-**ayc-o** ami

school.OBL-LOC fun.3SGM do-**PST.HAB-1PL** we.EXCL

या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्सच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० आंतरराष्ट्रीय या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल.
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

We used to have fun at school.

**४.११.१.३ पर्यायी रचना ३ : [क्रियापद-स्वर.सुसंवाद ओ/उ/इ/ए/अ]**

रीती भूतकाळ दर्शवण्यासाठी [क्रियापद-स्वर.सुसंवाद ओ/उ/इ/ए/अ] ही पर्यायी रचना राज्यातील चोवीस जिल्ह्यांमध्ये आढळली. या पर्यायी रचनेच्या भौगोलिक प्रसाराचा तपशील आणि उदाहरणे पुढे दिली आहेत :

| **जिल्हा** | **तालुका व गाव** |
|---|---|
| चंद्रपूर | चंद्रपूर - चकनिंबाळा व दाताळा, राजुरा - कोष्टाळा, ब्रह्मपुरी - पांचवाव व तोरगाव (बुद्रुक) |
| गडचिरोली | गडचिरोली - खुर्सा व शिवणी, कोरची - बोरी व मोहगाव |
| गोंदिया | गोंदिया - टेमनी व तेढवा, सडक-अर्जुनी - डुग्गीपार व चिखली |
| भंडारा | भंडारा - धारगाव व मुजबी, तुमसर - लोभी |
| नागपूर | नागपूर - येरला, भिवापूर - सावरगाव, रामटेक - भोजापूर, नरखेड - उमरी व पांढरी |
| वर्धा | आष्टी - खडका, हिंगणघाट - अजंती व पोती, सेलू - वडगाव जंगली व झडशी |
| यवतमाळ | घाटंजी - खापरी व कुर्ली, नेर - कोलुरा व दगड धानोरा |
| अमरावती | अमरावती - सावर्डी व मलकापूर, वरूड - गाडेगाव, दर्यापूर - भांबोरा, जितापूर व भामोद |
| अकोला | अकोला – येवता |
| वाशीम | वाशीम - शिरपुटी, रिसोड - घोणसर, कारंजा – गिरडा |
| बुलढाणा | बुलढाणा - पळसखेड भट, जळगाव-जामोद - वडगाव पाटण व निमकराड, शेगाव - शिरजगाव (निळे) व पाडसूळ |
| नांदेड | नांदेड - पांगरी, किनवट - इस्लापूर, देगलूर - खानापूर |
| हिंगोली | कळमनुरी - मोरवड |
| औरंगाबाद | सोयगाव - घोसला |
| जळगाव | जळगाव - धामणगाव व वडली, जामनेर - वाकोद व वाघारी, रावेर - मांगलवाडी, चाळीसगाव - दहिवद, चोपडा - वैजापूर |
| धुळे | धुळे - लळींग, सोनगीर, खेडे व खोरदड, शिरपूर - आंबे, शिंगावे व बोराडी, साक्री - दिघावे व धाडणे |
| नंदुरबार | नंदुरबार - घोटाणे व धानोरा, नवापूर - खांडबारा व चिंचपाडा, शहादा - प्रकाशा व शहादा |

या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्सच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० आंतरराष्ट्रीय या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल.
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

| | |
|---|---|
| नाशिक | मालेगाव - कळवाडी व कौळाणे (गा.), सटाणा - दरेगाव, सुरगणा - काठीपाडा,<br>त्र्यंबकेश्वर - गोलदरी, येवला - बोकटे |
| पालघर | वसई - कळंब व निर्मळ, डहाणू - बोर्डी व मुरबाड व पिंपळशेत,<br>तलासरी - उधवा व गिरगाव, मोखाडा - दांडवळ व कारेगाव |
| रायगड | रोहा - चिंचवली |
| रत्नागिरी | रत्नागिरी - झाडगाव |
| सिंधुदुर्ग | मालवण - कट्टा, देऊळवाडा व दांडी, कुडाळ - मानगाव व कुडाळ,<br>वेंगुर्ला - वेंगुर्ला, सावंतवाडी - कोलगाव व सातर्डे |
| कोल्हापूर | चंदगड - कोदाळी |
| सातारा | वाई - चिखली |

**४.११.१.३.१ उदाहरण** (जि. नागपूर, ता. नागपूर, गाव येरला, पु७०, मांग (एस.सी), अशिक्षित)

कास्तकारीचे कामं क**रो** पयले

kastəkari**č̆e** kamə kər**o** pəyle

kastəkari-**č̆-e** kam-ə kər-**o** pəyle

agriculture.OBL-GEN-3PL work-3PL do-**PST.HAB.1SGM** first

I used to do agricultural work earlier.

**४.११.१.३.२ उदाहरण** (जि. सिंधुदुर्ग, ता. मालवण, गाव कट्टा, स्त्री५०, भंडारी , ७वी)

तिनंय मैत्रणी असाच्च कर**रू** लपान र**ऊ**

tinəy məitrəṇi əsac kər**u** ləpan rə**u**

tinə-y məitrəṇi əsa-c kər-**u** ləp-an rə-**u**

three-PRT friend.FPL thus-EMPH do-**PST.HAB**.1PL hide-CP stay-**PST.HAB.1PL**

We three friends used to hide earlier.

**४.११.१.३.३ उदाहरण** (जि. सुंधुदुर्ग, ता. कुडाळ, गाव कुडाळ, स्त्री४१, कुंभार, १०वी)

तो दररोज़ ज़ा**य** अन्नं नदीच्या काटी लाकडं तो**डी** दर्रो

to dərroj ja**y** ənnə nədič̆a kaṭi lakḍə toḍ**i** dərro

to dərroj ja-**y** ənnə nədi-č̆-a kaṭ-i lakḍə toḍ-**i** dərro

he everyday go-**PST.HAB** and river-GEN-OBL bank-LOC wood.3PL cut-**PST.HAB** everyday

He used to go at the bank of river and cut the woods.

या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्सच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० आंतरराष्ट्रीय या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल.
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

**४.११.१.३.४ उदाहरण** (जि. जळगाव, ता. चोपडा, गाव वैजापूर, पु३९, राजपूत, ७वी)

यकस टाईम जेवन भेटे

yəkəs ṭaim ǰewən bʰeṭ**e**

yək-ə-s ṭaim ǰewən bʰeṭ-**e**

one-OBL-EMPH time meal get-**PST.HAB**

We used to get food only once (in a day).

**४.११.१.३.५ उदाहरण** (जि. पालघर, ता. मोखाडा, गाव दांडवळ, स्त्री५०+, वारली, अशिक्षित)

आदी चांगला भरपूर पडं

adi caṅgla bʰərpur pəḍ**ə**

adi caṅgla bʰərpur pəḍ-**ə**

before good.3SGM much fall-**PST.HAB**

Earlier it used to rain a lot.

**४.११.१.४ पर्यायी रचना ४ : [क्रियापद-त+ज़ा-सुसंवाद]**

रीती भूतकाळ दर्शवण्यासाठी [क्रियापद-त+ज़ा-सुसंवाद] ही पर्यायी रचना राज्यातील फक्त सहा जिल्ह्यांमध्ये आढळली. या पर्यायी रचनेच्या भौगोलिक प्रसाराचा तपशील आणि उदाहरणे पुढे दिली आहेत :

| **जिल्हा** | **तालुका व गाव** |
| --- | --- |
| गडचिरोली | गडचिरोली - शिवणी |
| अमरावती | अमरावती - मलकापूर, दर्यापूर - जितापूर |
| अकोला | अकोला - येवता |
| वाशीम | वाशीम - शिरपुटी, कारंजा - गिरडा व दोनद (बुद्रुक) |
| जालना | जालना- धावेडी |
| बुलढाणा | बुलढाणा - पळसखेड भट, जळगाव-जामोद - वडगाव पाटण, शेगाव - पाडसूळ |
| जळगाव | चाळीसगाव - दहिवद |

**४.११.१.४.१ उदाहरण** (जि. वाशीम, ता. कारंजा, दोनद बु., स्त्री३३, कुणबी-पाटील, १२वी)

आमच्या खेडेगावात्नी भाजीपाला विकनारे येत ज़ायेत त आमी त्यांच्याकडलं घेत ज़ाओ

amcǎ kʰeḍegawatni bʰaǰipala wiknare ye**t** **jayet** tə ami tyañčǎkəḍlə gʰe**t** **jao**

am-č-a kʰeḍegaw-a-tni bʰaǰipala wik-nar-e ye-**t** **ja-yet** tə ami tyañ-č-a-kəḍ-l-ə gʰe-**t** **ja-o**

या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्सच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० आंतरराष्ट्रीय या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल.
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

we.EXCL-GEN-OBL rural village-OBL-LOC vegetables sell-NMZL-3PL come-**IPFV GO-PST.HAB.3PL** so we.EXCL they.OBL-GEN-OBL-LOC-PTPL-3SGN take-**IPFV GO-PST.HAB.1PL**
Vegetable sellers used to come to our village and we used to buy vegetables from them.

**४.११.१.५ पर्यायी रचना ५ : [क्रियापद-त+अस्-सुसंवाद]**

रीती भूतकाळ दर्शवण्यासाठी [क्रियापद-त+अस्-सुसंवाद] ही रचना राज्यातील केवळ पाच जिल्ह्यांमध्ये सापडली. या पर्यायी रचनेच्या भौगोलिक आणि सामाजिक प्रसाराचा तपशील आणि उदाहरणे पुढे दिली आहेत :

| **जिल्हा** | **तालुका व गाव** |
|---|---|
| बुलढाणा | बुलढाणा - वरवंड |
| हिंगोली | कळमनुरी - बाभळी व मोरवड |
| नांदेड | नांदेड - लिंबगाव |
| परभणी | सोनपेठ - तिवठणा |
| कोल्हापूर | कागल - केनवडे (कुणबी-मराठा समाज) |

**४.११.१.५.१ उदाहरण** (जि. परभणी, ता. सोनपेठ, गाव तिवठणा, पु२०, धनगर, बी.ए.)

एक टोपीवाला असा आपल्या गावातून टोप्या घेऊन विकायला ज़ात **असे**

ek ṭopiwala əsa aplya gawatun ṭopya gʰeun wikayla ja**t əse**

ek ṭopiwala əsa aplya gaw-a-t-un ṭopya gʰe-un wik-ayla ja-**t əs-e**

one cap seller thus.3SGM self.OBL village-OBL-LOC-ABL cap.PL take-CP sell-NON.FIN go-IPFV be.**PST.HAB**.3SG

A cap seller used to go from his village to sell caps.

या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्सच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० आंतरराष्ट्रीय या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल.
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/